वाचा:- मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.पुणे यांनी मान्य केलेली टिपणी दिनांक ३१/ १ /१९९२

.........

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग
जा.क्रं. शिक्षण/प्राथ/दोन/ ६१२ /९२
पुणे १ दिनांक:- २० . २ .१९९२

आ दे श

गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती पुरंदर यांचेकडून जा.क्रं. शिक्षण/१००२ दि २ १२/९१ माध्यमिक शाळा जेजुरी ता.पुरंदर येथे इयत्ता ५वी चा वर्ग सुरु करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणेसाठी - शिफारशीसह प्रस्ताव सादर केला आहे.

या कामी मंजूरीचे अधिकार शिक्षण समितीचे आहेत. परंतू जिल्हा परिषद दिनांक ३०.६.९० पासून बरखास्त झाल्याने मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.पुणे यांना म.रा.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ कलम २६० [२][ब] अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार खाली नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत इयत्ता ५वी चा वर्ग सुरु करण्यास या जिल्हा परिषदेची हरकत नाही.

| स्थानिक माध्यमिक शाळेचे नांव व पत्ता | इयत्ता | शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|
| जिजामाता हायस्कूल जेजुरी ता.पुरंदर | ५वी | जून ९१ पासून |

स्वाक्षरीवर मा. प्रशासक तथा मु.का.अ. यांची सही आहे.

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे. करिता

प्रति,

१] मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय - जेजुरी ता. पुरंदर
२] गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती पुरंदर पुढील कार्यवाहीसाठी
३] मा.मुख्य कार्यकारी अधिकारी [विशेष कक्ष] जि.प.पुणे माहितीसाठी सादर.

जा. क्रं. माध्य- ५ पुर्वी नं ४वी पुर्वी ९२
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-४११ ००१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 31 |3|92

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे

31 MAR 1992

विषय :- इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणेबाबत.
जिजामाता हायस्कूल, जेजूरी

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक - जिप-माध्य-ह-४/पुर्वी नं ४वी मान्यता/१९९१-९२
९८ दि. २४-२-१९९२

उपरोक्त विषयाधिन संदर्भाच्या पत्रा न्वये कळविण्यात येते की, ~~१९८४~~ १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्रं. एसएसएन/१०८५/२३४८५[२४४-एन] माशि-१, दि. २९.१.८६ व दि. २०.१२.८८ च्या शासनादेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इ. ५ वी ते ७ वी च्या वर्गाना जून, १९८७ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी- १] इ. ५ वी ते ७ वीच्या वर्गांची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहिल.

२] मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३] तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे तसेच आपण सदर शाळेस १५ दिवसांचे आत भेट देऊन इ. ५ वी ते ७ वी च्या सद्या सुरु असलेल्या वर्गांची तपासणी करावी व तपासणी अहवाल व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

मा. शि. उ. सं. यांच्या मान्य
टिपणीनुसार,

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत :- १] मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांना सविनय सादर.

२] मुख्याध्यापक जिजामाता हायस्कूल जेजुरी ता. पुरंदर जि. पुणे